# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(ब-१) अन्वये आदेश.

जा.क्र.मुंबई सनि एसाव बी-१/ ८ /सन २०१८.

-: का र्या ल य :-

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई
कक्ष क्र.२०२,दुसरा मजला कोकणभवन, नवी मुंबई-६१४.
दिनांक - ५/१/२०१८

**वाचावे** :-१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ(ब)(१) मधील तरतूद.
२) अॅड श्री बनीयाल यांची लेखी तक्रार दि.२/५/२०१७
३) या कार्यालयाचे चेअरमन सचिव व अर्जदार यांना सुनावणी नोटीस दि.१९.११.१७
४) संस्थेचे चेअरमन यांनी सादर केलेले सामुहिक राजीनामे पत्र दि.१६.११.१७.

ज्याअर्थी गुंडेचा अल्तुरा को-ऑप हौसिंग सोसायटी लि, एल.बी.एस.मार्ग,कांजुरमार्ग(प) मुंबई-७८, ही संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आहे.संस्थेचा नोंदणी क्र.एमयुएम/डब्ल्युएस/एचएसजी/टीसी/१०५३९/सन २०१२.२०१३ असा आहे.आणि,

ज्याअर्थी गुंडेचा अल्तुरा को-ऑप हौसिंग सोसायटी लि, कांजुरमार्ग(प)मुंबई-७८ (यापुढे अधिनियम असे वाचावे)महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे) आणि संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतूदीनुसार संस्थेचे कामकाज व्यवस्थापक समितीने चालविणे बंधनकारक आहे.आणि,

ज्याअर्थी वरील संदर्भिय क्र.२ अन्वये संस्थेच्या विदयमान व्यवस्थापक समितीविरुध्द सभासद अॅड.श्री बी.आर.बनीयाल यांनी लेखी तक्रार करण्यात आली होती.अर्जदार यांच्या तक्रारीच्या अनुषगाने या कार्यालयाने संस्थेस दि.१०/४/१७,२६/९/१७,१२/१०/१७, रोजीच्या पत्राने लेखी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.व संस्थेने दि.२३.१०.१७ रोजीच्या लेखी पत्राने अर्जदार यांची तक्रारीची प्रत व खुलासा सादर करण्यात वेळ मागितला होता परंतू तक्रार अर्जातील मुददयाबाबत कोणताही खुलासा सादर केला नाही आणि,

ज्याअर्थी वरील संदर्भिय क्र.३ अन्वये या कार्यालयाने अर्जदार यांचे तक्रारीतील मुददयाबाबत वस्तुस्थिती पडताळणीसाठी प्रत्यक्ष सुनावणीसाठी संस्थेचे चेअरमन/सचिव व अर्जदार यांना दि.१७/११/२०१७ व दि.२६/१२/२०१७ रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले आहे.`.दि.२६/१२/२०१७ रोजीच्या सुनावणी वेळी संस्थेचे चेअरमन श्री शैलेश शहा यांचे म्हणणे संस्थेच्या दिनांक २९/१०/२०१७ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत ९ सदस्यांनी राजीनामे दिलेले आहेत.व दि.१६/११/२०१७ रोजी ९ सदस्यांनी वैयक्तीक रित्या माझेकडे राजीनामे दिलेले आहेत.अध्यक्ष म्हणून मी ही राजीनामा दिला आहे व सदरचे राजीनामे आपले कार्यालयास सादर केलेले आहेत.त्यामुळे सदस्यांनी दिलेले राजीनामे मंजूर करण्यात यावे अशी विनंती केली त्यांचे राजीनामे मान्य केल्यामुळे संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे बाबतचा निर्णय घेण्यात आला. आणि,

ज्याअर्थी विदयमान व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजीनामे दिल्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झालेली आहे.दैनदीन कामकाज ठप्प झाल्यामुळे संस्था व सभासदांच्या हितास बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याने विदयमान व्यवस्थापक समिती बरखास्त करुन संस्थेचे दैनदीन कामकाज व नवीन व्यवस्थापक समितीची निवडणूकीची प्रक्रीया बाबत कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(ब-१) अन्वये व्यवस्थापक समितीने काम करण्याचे बंद केले आहे. व संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबतची तरतूद असल्यामुळे खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

:- **आ दे श** :-

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(ब-१)** अन्वये मला प्राप्त अधिकारामुळे मी राजेश **लव्हेकर, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था**, एस विभाग, मुंबई, गुंडेचा अल्तुरा को-ऑप हौसिंग सोसायटी लि, कांजूरमार्ग(प) मुंबई-७८. **या संस्थेची व्यवस्थापक** समिती बरखास्त करुन त्यांचेऐवजी अॅड.बी.टी.ठोकळ, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत **आहे.प्राधिकृत** अधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी घ्यावयाच्या निवडणूकीसाठी नियमानुसार ई-१,व ई-२, नमुन्यात निबंधक कार्यालयास एक महिन्याच्या आंत माहिती सादर करणे बंधनकारक आहे.प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी दप्तराचा ताबा घेतलेपासून तीन महिने इतका राहिल.

सदरचा आदेश मी आज दिनांक ३१/१/२०१८ रोजी माझी स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

(राजेश लव्हेकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस-विभाग,मुंबई

**प्रत:- माहितीसाठी**

**१)चेअरमन/सचिव,** गुंडेचा अल्तुरा को-ऑप हौसिंग सोसायटी लि, कांजूरमार्ग(प) मुंबई-७८,
२/- यांनी त्वरीत नियुक्त प्राधिकृतअधिकारी यांचेकडे दप्तराचा ताबा सुपूर्द करावा.

२) अॅड.बी.टी.ठोकळ, प्राधिकृत अधिकारी गुंडेचा अल्तुरा को-ऑप हौसिंग सोसायटी लि, कांजूरमार्ग(प) मुंबई-७८.
आपण त्वरीत संस्थेच्या नोटीस बोर्डावर आदेशाची प्रत चिपकावून नियमानुसार दप्तराचा ताबा घ्यावा.व सदरचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३)शाखाधिकारी,मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि, शाखा भांडूप/विक्रोळी/कांजूरमार्ग.
आपण त्वरीत संस्थेचे बॅक खाते नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचे नावे नियमानुसार हाताळण्यात यावे.

४)स्थळ प्रत.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था एस विभाग मुंबई

Scanned by CamScanner